गुणवत्ता वाढीतून लोक सहभागाकडे "समृध्द शाळा"
(Social Acceptance for Money and Other Resource Donations by Society).

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- शैगुवि २०१६/(५/२०१६)/एसडी-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ मार्च, २०१६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील जनता जागरुक असून प्रत्येक क्षेत्रामध्ये अगदी तळागाळापर्यंत त्यांचा सक्रिय सहभाग असतो. शिक्षण क्षेत्रात सुध्दा तशीच परंपरा आहे. अलिकडच्या काळात चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण सर्वांना अति आवश्यक वाटायला लागले आहे. ते मिळविण्याकरिता जवळ-जवळ प्रत्येक नागरिक आसुसलेला आहे. याची सर्वात आधी प्रचिती पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांकडे लागलेल्या ओढीच्या स्वरुपात दिसून येते. सदरचे शिक्षण खर्चिक असून देखील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील अगदी गरीबातले गरीब पालक भरमसाठ खर्च करुन आपल्या पाल्यांना गावापासून लांबच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये, बसची फी वगैरे देऊनसुध्दा पाठवण्यास सुरुवात केली आहे.

परंतु ज्या ठिकाणी मराठी माध्यमाच्या शाळेची गुणवत्ता चांगली आहे व इंग्रजी भाषेचे शिक्षण विशेष करुन "स्पोकन इंग्लिश" गुणवत्ता पूर्ण आहे अशा शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा सोडून सुध्दा मुले परत यायला लागली आहेत. अशी उदाहरणे पुणे, कोल्हापूर, नाशिक व धुळे जिल्ह्यामध्ये पहायला मिळाली आहेत. इतर जिल्ह्यांमध्ये सुध्दा असे घडत असेल, जे अधिक अभ्यासांती कळेल. अशा प्रकारे ज्या शाळा गुणवत्तापूर्ण झाल्या आहेत, त्या शाळांना पालक व इतर नागरिक मोठया प्रमाणावर आर्थिक व भौतिक मदत करीत आहेत. आर्थिक सुबत्ता असलेल्या जिल्हयांमध्ये ही परंपरा सुरुवातीपासूनची आहे. परंतु, आता विशेष करुन "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम" याची सुरुवात झाल्यानंतर अशा सहभागाच्या प्रक्रियेस उधाण आले आहे आणि राज्यात असा सहभाग सर्वदूर सर्वत्र पसरत आहे. याची काही कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" कार्यक्रमात पहिल्यांदाच शासनाने शिकलेली मुले दाखविण्याबद्दल स्पष्ट आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक शिक्षक व शाळा यांनी आपापल्या परीने गुणवत्तेसाठी झटण्यास सुरुवात केली आहे.

२) "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" कार्यक्रमामध्ये फलनिष्पत्तीपेक्षा प्रक्रियेचा सुध्दा पाठपुरावा केला जात आहे. प्रक्रियेबाबत शिक्षकांना स्वातंत्र्य दिले असले तरी, काही दृश्य स्वरुपाच्या प्रक्रियेचा नियमित अहवाल मागविला जातो. यामुळे प्रत्येक जिल्ह्याला आपल्या किती शाळा डिजिटल झाल्या, ISO-9000 झाल्या, ABL झाल्या, ज्ञानरचनावादी झाल्या किंवा स्वयंसेवी संस्थांनी /CSR ने दत्तक घेतल्या याचे सनियंत्रण करावे लागत आहे.

३) "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" कार्यक्रमात कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आली नाही, तरीसुध्दा गुणवत्तेची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. गुणवत्तेची अपेक्षा पालकांच्या अपेक्षेस थेट भिडत असल्यामुळे ते प्राप्त करुन घेण्यासाठी पालक आपोआप "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" कार्यक्रमाशी एकरुप होत आहेत. यामुळे ज्या-ज्या शाळा गुणवत्ता वाढीसाठी पुढे सरसावल्या त्या सर्व शाळांना लोक भरभरुन मदत करीत आहेत याची काही उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.

1) केंजळ, उच्च प्राथमिक शाळा, ता.भोर, जि.पुणे येथे लोकसहभागाने जवळ-जवळ रु.२.०० कोटीची दोन मजली शाळेची इमारत बांधून दिली. शाळेला जोडून उर्जा प्रकल्प (Park) केला. शाळेत सुसज्ज संगणक शाळा तयार केली आणि प्रत्येक मुलाला टॅबलेट देऊ केला. गावातील बरीच मुले नजिकच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांत शिकत होती, त्या सर्व मुलांना पालकांनी या शाळेत दाखल केले. त्यामधील एका पालकाने मुख्याध्यापकास विचारले, “किती फी द्यावी लागेल?” मुख्याध्यापक जेव्हा उत्तरले की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत मोफत शिक्षण दिले जाते, तेव्हा पालकाने जणू काही (ब्लँक चेक) कोरा धनादेश दिला. त्यांनी सांगितले “बरं पण शाळेसाठी काही लागल्यास सांगा”

2) केंजळ गावाने अलिकडेच नंदूरबार जिल्ह्यातील काही शाळा दत्तक घेऊन त्या विकसित करण्याची चिन्हे दिसत आहेत.

3) पष्टेपाडा, जि.प.प्राथमिक शाळा, ता.शहापूर, जि.ठाणे हे एक आदिवासी गांव, परंतु सभोवताली उद्योगधंद्याचा / कारखान्याचा विस्तार झालेला आहे. शिक्षकाने पालक व CSR (Corporate Social Responsibility) च्या मदतीने रु.३ लाखाचे संगणक साहित्य व मुलांना टॅबलेट दिले. या शाळेत १००% मुले शिकत आहेत. एवढेच नव्हे तर मुले टॅबलेटचा वापर घरात उजळणीसाठी करतात. काही मुले घरात असलेल्या लहान टीव्हीला टॅबलेट लावून पूर्ण कुटूंबासह अभ्यास करतात. त्यामुळे प्रौढ साक्षरतेला देखील अप्रत्यक्ष चालना मिळाली आहे. मुले परिसरातील बाबींचा व्हिडीओ रेकॉर्ड करुन वर्गात आणतात आणि त्यावर चर्चा करतात.

वरील बाबी घडल्यामुळे विविध पातळीवरील मान्यवरांनी / लोकप्रतिनिधींनी या गावानां भेटी दिल्या. त्यावेळी गावाच्या मुलभूत सुविधांमध्ये कमतरता असल्याची बाब लक्षात आल्यामुळे गावकऱ्यांनी सदर कमतरता दूर केल्या. म्हणून शाळेमुळे गावाचा विकास झाला असेही म्हणता येईल.

4) पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील एका शिक्षकाने पष्टेपाडयाची शाळा पाहून मोखाडयातसुध्दा एक तरी पष्टेपाडा सारखी शाळा करावयाचे ठरविले. त्या खेडेगावातील सर्व पालक आदिवासी असून सदर खेडेगांवाच्या नजिक उद्योगधंदे सुध्दा नाहीत. परंतु ठरलेले काम करावयाचे हाते. त्या शिक्षकाने गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे आपली इच्छा जाहीर केली. गट शिक्षणाधिकाऱ्यांनी तालुक्यातील सर्व शिक्षकांना आवाहन केले. सर्व शिक्षकांनी स्वत:च्या पदरचे पैसे (प्रत्येकी रु.१०००-१५००) घालून सदरचे काम पूर्णत्वास नेले.

5) निकुंभे, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ता.धुळे जि.धुळे या शाळेला लोकसहभागाने १० संगणक असलेली सुसज्ज संगणक शाळा दिली आहे. लोकसहभागासोबतच काही स्वयंसेवी संस्थांनी सुध्दा या गावास मदत केली आहे. या गावाची एक वस्तीसुध्दा आहे आणि तिथेही शाळा आहे. एका आदिवासी समाजातील रोजंदारीवर काम करणाऱ्या व्यक्तिची नातवंडे त्या वस्तीच्या शाळेत शिकतात. या व्यक्तिने वस्तीच्या शाळेला रु.५००/- तर मुख्य शाळेला रु.५५१/- ची देणगी दिली. दोन-दोन शाळांना देणग्या देण्याचे कारण विचारल्यावर "शिक्षण गुणवत्तपूर्ण झाल्याने त्या आदिवासी समाजाची सुध्दा उन्नती होईल म्हणून देणग्या दिल्या असे त्यांनी सांगितले”

6) धुळे जिल्ह्यात जन्मलेल्या एका व्यक्तीने अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये सेवा केली. त्यांच्याकडे असलेल्या पैशातून त्यांनी लोक सहभागात भर घालण्याची योजना तयार केली. त्यांनी काही संगणक साहित्यांचे

संच तयार केले. सदरचे संच विकत घेण्यासाठी एकूण लागणाऱ्या राशीपैकी ३० टक्के इतकी रक्कम त्यांनी स्वत: देऊ केली. अशा पध्दतीने १०० शाळांचे त्यांचे लक्ष्य असून आतापर्यंत ४५ शाळा वा असे संगणक संच पूर्ण करण्यास त्यांना यश आले आहे. अमेरिकेतून अजून काही राशी जमा करणे त्यांना शक्य वाटते. त्यामुळे येत्या काळात त्यांचे लक्ष्य अजून मोठे होऊ शकते.

वरील व्यक्तीच्या बोलण्यावरुन असेही जाणवले की, मा.पंतप्रधान यांनी मॅडिसन स्क्वेअर गार्डन, न्यूयॉर्क, अमेरिका येथे केलेल्या भाषणाचा त्यांच्यावर परिणाम झालेला आहे.

मधल्या काळात एका अप्रवासी भारतीयाने न्यूयॉर्क विद्यापीठाला सुमारे रु.६५० कोटी इतके दान दिल्याची बातमी आली होती. अमेरिकेत माजी विद्यार्थी संघाद्वारे शैक्षणिक संस्थांना मोठया प्रमाणावर देणग्या दिल्या जातात. त्याच धर्तीवर धुळे जिल्ह्यात सुध्दा अशी एक चळवळ उभी होताना दिसत आहे.

7) नाशिक जिल्ह्यात शिक्षणाधिकाऱ्यांच्या एका सादरीकरणात रु.१४ कोटीचा लोकसहभाग प्राप्त झाल्याचे दिसून आले. हा सहभाग मुख्यत्वे शाळांच्या इमारतीचे बांधकाम, संगणक पुरविणे, ज्ञानरचनावादी साहित्य निर्मितीस समाजाकडून सहाय्य व ISO-९००० करण्याकरिता आर्थिक मदत या स्वरुपात आहे.

8) नंदुरबार जिल्ह्यामध्ये याचप्रमाणे अवघ्या ४ महिन्यात लोक सहभागातून ६० शाळा डिजिटल झाल्या आहेत.

9) शैक्षणिकदृष्टया सर्वात मागासलेल्या ५ जिल्ह्याची निवड करुन त्यामधील मुलांच्या सर्वाधिक गळतीचे निकष लावून निवडलेल्या भामरागड (जिल्हा गडचिरोली), धडगांव, सेनगांव, हदगांव व मानवत गटांमधील भामरागड (जिल्हा गडचिरोली) मध्ये सर्व शाळांना आकर्षक करण्याच्या दृष्टीने लोक सहभागातून रंगरंगोटी करण्यात येत आहे.

वरील सर्व उदाहरणांवरुन स्पष्ट आहे की, राज्यात विविध भागात लोक सहभागाच्या प्रक्रियेस उधाण आले आहे. या प्रक्रियेमागे काही सिध्दांत आहे का ? याचा राज्य स्तरावरुन उहापोह केला गेला. त्यातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे :-

१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (Weaker section) पालक सुध्दा शिक्षणाला विकासाची पहिली पायरी समजत आहेत.

२) लोक सहभाग मिळविण्याकरिता शिक्षक, आधी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधरवतात. मुले बोलकी झाली, विचारलेल्या प्रश्नांची आत्मविश्वासाने उत्तरे द्यायला लागली, इंग्रजीमध्ये काही वाक्ये बोलायला लागली की पालक त्याकडे आकर्षित होतात, आणि शाळेला मदत करायला सुरुवात करतात. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांचा सहभाग व्यवस्थापनामध्ये महत्वाचा आहे.

३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना कितीही देणग्या दिल्या आणि मदत केली तरी, खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या फी पेक्षा कमी खर्च होणार आहे, हे पालकांच्या लक्षात आले आहे.

४) पालकांना मुलांची शैक्षणिक गुणवत्ता हवी आहे. सोबतच मुलांना इंग्रजी सुध्दा यायला हवे आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षक (म्हणजेच आत्मविश्वासाने बोलणारी मुले) मिळत नसल्यास त्या शाळांतून मुलांना काढून घेण्यात येत आहे.

५) मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेची अपेक्षा पूर्ण झाल्यावर अगदी रोजगार हमी योजनेवर काम करणारी व्यक्ती देखील आर्थिक मदत करतो, अशी राज्यात प्रत्येक जिल्ह्यात कितीतरी उदाहरणे आहेत.

६) ई-लर्निंग व डिजिटल शाळांबद्दल संबंध राज्यांमध्ये कमालीचे आकर्षण आहे.

७) ISO-९००० कडे सुध्दा कल वाढत चालला आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे. :-

**परिपत्रक :-**

1) राज्यातील सर्व शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षक दिले जावे. शाळेतील प्रत्येक मुलाने आत्मविश्वासाने प्रश्नांना उत्तर दिले पाहिजे आणि इंग्रजी सुध्दा त्यांना बोलता आले पाहिजे, अशी गुणवत्ता प्राप्त झाली की नाही याचे स्वयंमूल्यमापन शाळेने आपल्या पातळीवर करावे. या स्वयंमूल्यमापनाचे एक मोजमाप शाळेत शिकणाऱ्या सर्व मुलांच्या पालकांनी स्वेच्छेने सहभागी होऊन नोंदविणे हे असावे, अगदी शेवटचा पालक जोपर्यंत शाळेच्या गुणवत्तेशी समाधानी होत नाही, तो पर्यंत काम पूर्ण झाले नाही हे समजावे.

2) येत्या काळात शासन स्वत: शाळांच्या प्रमाणीकरणाची योजना आणणार आहे. याआधीच्या शाळांच्या मूल्यमापनाच्या सर्व योजना बंद केल्या जाणार आहेत. राज्यातील १००% शाळा या योजनेत प्रमाणित होतील, या बेताने सदर कार्यास सुरुवात करण्यात यावी, असे करुन सर्व शाळा समृध्द (Social Acceptance for Money and Resource Donations by Society) शाळा होतील यासाठी काम करावे.

3) शिक्षणात लोकसहभाग वाढविण्याकरिता विविध पर्याय सोबत जोडलेल्या परिशिष्ट-(अ) मध्ये देण्यात आले आहेत. यातल्या आवडलेल्या बाबी शाळांनी आपल्या स्तरावर राबवावे जेणेकरुन बिंदु क्र.१ व २ पूर्ण होण्यास मदत होईल.

4) एका समृध्द गावाने शैक्षणिकदृष्टया मागास असलेली दुसरी गावे दत्तक घ्यावीत. उदा.कोल्हापूर, पुणे सारख्या प्रगत भागातील गावांनी नंदूरबार मधील आदिवासी भागातील गावे दत्तक घ्यावीत.

5) शाळेच्या नावामध्ये शाळा व्यवस्थापन समितीचा उल्लेख असावा. उदा.जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, पष्टेपाडा, ठाणे याऐवजी जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती, पष्टेपाडा संचलित प्राथमिक शाळा, तालुका शहापूर जिल्हा ठाणे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१८१४५४४१९१२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2016.03.28 10:56:32 +05'30'

**( डॉ.सुवर्णा सि.खरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय, मुंबई-३२,
५. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, यांचे स्वीय सहायक
६. मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
८. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
९. अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य,पुणे
१०.शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
११.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१२.सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
१३.सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
१४.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व
१६.शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई
१७.प्रशासन अधिकारी, महानगरपालिका सर्व
१८. निवडनस्ती एस.डी.६

# परिशिष्ट - अ

## शिक्षणात लोकसहभाग- विविध पर्याय

१) **शाळेचा स्थापना दिन दरवर्षी साजराकरणे : -**

**अ)** जि.प.शाळांचा स्थापना दिन साजरा करुन सर्व माजी विद्यार्थ्यांना दरवर्षी शाळेत बोलविता येईल व विविध कार्यक्रम आयोजित करुन लोकसहभाग मिळविता येईल.

२) **शिक्षण मित्र :-**

१) शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी बुध्दीचे, कौशल्याचे, वेळेचे ऐच्छिक परंतू नियमित योगदान देणाऱ्या व्यक्तींना "शिक्षणमित्र" असे संबोधावे.

अ) गावातील खेळाडू, तरुण, विद्यार्थ्यांना खेळ शिकवतील, वैयक्तिक / सांघिकखेळात शाळांचा दर्जा उंचावतील.

ब) गावातील महाविद्यालयातील एन.सी.सी/एन.एस.एस. मध्ये सहभागी असणारे तरुण, माजीसैनिक, कब / बुलबुल सारख्या योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यास मदत करतील.

क) गावातील लोकसंगीत, कला व विविध व्यवसायांबाबतीत मुलांना शिकवतील.

ड) विज्ञान, गणित, इंग्रजी या विषयांसाठी त्या त्याक्षेत्रात शिकणारे तरुण शाळेत मदत करतील व शाळेची प्रयोगशाळा विकसित करतील.

इ) व्यसनमुक्ती, पर्यावरण, आरोग्य जागृती याबाबतचे विविध उपक्रम राबवता येतील.

ई) सेवानिवृत्त झालेले शिक्षक/मु.अ. वरील सर्व बाबींमध्ये मदत करु शकतील (अधिक माहितीसाठी वाचा: अतिथि निदेशक शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र/२०१५/प्र.क्र.४/१५/टीएनटी २ दिनांक ७.१०.२०१५.)

**शिक्षणनिधी :-**

अ) गावातील शाळेसाठी गावाने खाजगी लोक व माजी विद्यार्थ्यांकडून निधी उभारावा.

ब) गावाला मिळणाऱ्या अनुदान व पुरस्कारांच्या रक्कमेतील १५ ते २०% रक्कम शाळेसाठी खर्च करण्यात यावेत.

**३) <u>समृध्द शनिवार</u> :-**

**अ)** शेतमजूर, शेतकरी पालक सकाळी व संध्याकाळी उपलब्ध असतात. अधिकांश ठिकाणी शनिवारी शाळा सुध्दा सकाळीच भरतात. शनिवार सकाळची वेळ शिक्षक व पालक या दोघांच्या सोयीचे असलेने पालक सभा व शाळा व्यवस्थापन समिती बैठक प्रभावीपणे होतील.

ब) त्याचप्रमाणे शनिवारी फक्त सकाळची शाळा असल्याने दर शनिवारी इ. ६ ते ८ वी या इयत्तातील विद्यार्थ्यांना दोन तास त्यांच्या कलानुसार गावातील विविध उद्योग, व्यावसायिक, कारागीर यांचेकडे पाठवावेत.

**४) <u>ग्रामपंचायत कर्मचारी व संसाधनांची मदत</u> :-**

**अ)** आवश्यक वेळी ग्रामपंचायत कर्मचारी व संसाधनांची (संगणक इत्यादी) मदत शाळांनी उपलब्ध करुन घ्यावी.

**५) <u>समन्वयग्रंथालय</u>:-**

अ) शासनाने दिनांक ७.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी मा. श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम, माजी राष्ट्रपती यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वाचन प्रेरणा दिवस साजरा करावयाचे ठरविले आहे.

ब) तिस-या वर्गापलीकडील प्रत्येक मूल दरवर्षी १५ ऑक्टोबर, रोजी १० पुस्तकांचे वाचन करावयाचे आहे. राज्यातील २.२५ कोटी शाळकरी मुलांचे हिशेब धरल्यास राज्यात दरवर्षी त्यादिवशी २० कोटी पुस्तके वाचली जाणार आहेत.

क) वरील उद्दष्ट पूर्तीसाठी लहानातल्या लहान शाळेत किमान २०० पुस्तकांचे वाचनालय असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी पुस्तके असलेल्या शाळांनी लोकसहभागातून अधिकची पुस्तके मिळवावीत.

ड) वरील पुस्तके अधिक समाजाने देऊ केलेली पुस्तके मिळून शाळेच्या वेळे० यतिरिक्त चालणारे समन्वय वाचनालय सुरु करण्यात यावेत, या ग्रंथालयाने गांव व शाळा यात समन्वय साधावा.

इ) या ग्रंथालयाने शिक्षणमित्र, शाळा व्यवस्थापन समिती व शाळा यांचा सहभाग घेऊन सह शालेय उपक्रम राबवावेत, यात रात्र अभ्यासिकेचाही समावेश असू शकते.

**६) बालस्नेही गांव:-**

**अ)** किमान ५ शाळामित्र परंतु प्रत्येक १० मुलांमागे किमान एक शाळामित्र असतील अशी गांवे.

ब) शाळेची सर्व भौतिक सुविधा पूर्ण केल्यावर निधी शिल्लक असेल एवढा निधी जमा केलेली गांवे.

क) कोणत्याही मुलाला पालकां कडून किंवा शिक्षकां कडून कोणतीही शिक्षा केली जात नाही अशी गांवे.

ड) १०० टक्के मुले शाळेत नियमित जातात आणि १०० टक्के मुले गुणवत्ता प्राप्त आहेत. यात विशेष गरजा असणारी मुले, स्थलांतरीत होऊन जाणारी व येणारी मुले तसेच सर्व मुली यांचा समावेश राहील अशी गांवे.

ई) प्रत्येक शाळकरी मूल जेवणापूर्वी व शौचास गेल्यानंतर साबणाने सात स्टेप प्रमाणे हात स्वच्छ धुतात अशी गावे.

फ) गावांतील ६ ते १४ वयोगटातील एकसुध्दा मुले उघडयावर शौचास बसत नाहीत अशी गांवे.

वरील सर्व अटी गाव पूर्णकरीत असलेल्या गावांना बालस्नेह गांव संबोधण्यात यावे.

.....